# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : **diplomadesk10dte@gmail.com** Internet : www.dtemaharashtra.gov.in


**परीपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/अभ्या.बंद/2015/ ६६७

दिनांक : - 4 JUL 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/पुणे.

**विषय : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीतील पदविका अभ्यासक्रम बंद करणे/ अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करणेबाबत संचालनालयाची मान्यता प्रदान करणेबाबत....**

असे निदर्शनास आले आहे की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत असलेले व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेशी संलग्न असलेल्या पदविका अभ्यासक्रम बंद करण्यात आल्यानंतर अथवा अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या कार्यालयाकडून/ विभागीय कार्यालयाकडून संबंधीत संस्थेचे संलग्नीकरणाच्यावेळी सदर अभ्यासक्रम बंद करण्यात आल्याबाबत / अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करण्यात आल्याबाबतचे संचालनालयाच्या आदेशाची मागणी करण्यात येते.

त्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत असलेले व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेशी संलग्न असलेल्या पदविका अभ्यासक्रम बंद करण्यात आल्यानंतर अथवा अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करण्यात आल्यानंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या संबंधीत संस्थेच्या मुदतवाढ पत्रातून सदर अभ्यासक्रम वगळण्यात येते. तसेच अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता कमी करण्यात आली असल्यास संबंधीत संस्थेच्या मुदतवाढ पत्रात तसे त्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशक्षमतेच्या स्तंभात दर्शविले जाते.

तदनंतर शासनामार्फत संबंधीत संस्थेच्या अभ्यासक्रम बंद केल्याबाबत/ अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी केल्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो. शासन स्तरावरुन शासन आदेश निर्गमित झाल्यानंतर तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत सदर अभ्यासक्रम बंद केल्याबाबत अथवा अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी केल्याबाबत वेगळे आदेश निर्गमित करण्यात येत नाहीत. सदर बाब आपले स्तरावरुन संबंधीत संस्थांच्या निदर्शनास आणावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

---

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
क्र :—तंशिसं/विकाना/पदविका/२०१५/ 2072 @
दि. - 9 JUL 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
नागपूर विभाग , नागपूर.

सदर परिपत्रक सर्व संस्थांच्या माहितीकरिता .त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे सदर परिपत्रातील सूचनांची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर , यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.